SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR-416 004. MAHARASHTRA
PHONE : EPABX-2609000 PGBUTR - 2609139
website: www.unishivaji.ac.in
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर – ४१६ ००४, महाराष्ट्र
दुरध्वनी : (ईपीएबीएक्स) 2609000 पी.जी.बी.यु.टी.आर- 2609139
e-mail : pgbutr@unishivaji.ac.in
Estd : 1962
NAAC A++ Grade

Ref. No. : SU/PGBUTR/Admi. 2019-20/ 10367

Date : 03 JUN 2022

प्रति,

1. अधिविभागप्रमुख, सर्व अधिविभाग,
   सर्व पदव्युत्तर अधिविभाग / पदव्युत्तर अभ्यासक्रम,
   शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2. मा. प्राचार्य,
   सर्व संलग्नित महाविद्यालये/पीएच.डी.संशोधन केंद्र/ प्रयोगशाळा,

**विषय :- महाज्योती अधिछात्रवृत्ती योजनेच्या अनुषंगाने आवश्यक प्रमाणपत्राबाबत.**

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयसंदर्भात आपणास आदेशान्वये कळविणेत येते की, महाज्योती यांनी पीएच.डी. विद्यार्थ्यांसाठी संशोधन अधिछात्रवृत्ती योजनेची नियमावली प्रसिध्द केली आहे. याअंतर्गत महाराष्ट्रातील इतर मागासवर्गीय, विमुक्त जाती–भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील उमेदवारांकरिता पीएच.डी. करण्यासाठी अधिकतम 5 वर्षाची अधिछात्रवृत्ती योजना जाहिर केली आहे. सदर नियमावलीअंतर्गत संबंधित संस्थेने आवश्यक असणारे वेगवेगळे निकष व कागदपत्राची यादी दिली आहे. सोबत नियमावली जोडली आहे.

1. सोबत जोडलेल्या नियमानुसार महाज्योती यांच्या परिशिष्ठ 'ब' नुसार पीएच.डी. विद्यार्थी यांनी संशोधन मार्गदर्शक व संशोधन केंद्र प्रमुख यांचे संयुक्त प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे संशोधन केंद्रात रूजू झाल्याचे पत्र विद्यार्थ्यास आवश्यक आहे. तेव्हा ज्या महाविद्यालयास / संस्थेस / विद्यापीठामार्फत मान्यताप्राप्त संशोधन केंद्र / प्रयोगशाळा म्हणून मान्यता प्राप्त झाली असेल अशा ठिकाणी Joining Letter मान्यताप्राप्त संशोधन केंद्र / प्रयोगशाळा यांचे संबंधित प्राचार्य / प्रमुख यांच्या स्वाक्षरीने व संबंधित मार्गदर्शकांच्या स्वाक्षरीने वरीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.
2. ज्या संलग्न महाविद्यालयांना मान्यताप्राप्त संशोधन केंद्र / प्रयोगशाळा म्हणून मान्यता नाही, तथापि त्या महाविद्यालयातील मार्गदर्शक यांनी विद्यार्थी Allot झाले असतील तर अशा प्रकरणात विद्यापीठातील अधिविभाग हे संशोधन केंद्र म्हणून दर्शवून, संबंधित अधिविभागप्रमुख (संशोधन केंद्र प्रमुख म्हणून) व विद्यार्थ्यांचे मार्गदर्शक यांच्या स्वाक्षरीने Joining Letter देणेबाबतची कार्यवाही करण्यात यावी.
3. त्याचप्रमाणे काही शिष्यवृत्तीकरिता उपस्थिती नोंदवण्याची अट आहे. तेव्हा याबाबत देखिल संशोधक विद्यार्थ्यांची उपस्थिती संबंधित मार्गदर्शक व मान्यताप्राप्त संशोधन केंद्र / प्रयोगशाळा यांचे प्रमुख / अधिविभागप्रमुख यांच्या स्वाक्षरीने कार्यवाही करण्यात यावी.

कळावे,

आपला विश्वासू,

प्र. कुलसचिव

सोबत : – वरीलप्रमाणे
प्रत:– माहितीकरिता –
१. मा. प्र–कुलगुरू कार्यालय
२. मा. परीक्षा नियंत्रक कार्यालय
३. मा. कुलसचिव कार्यालय,
४. प्र. संचालक, संगणक केंद्र

Aditi All- all type letter